ePaper
‘मोदी महान आहेत’! डोनाल्ड ट्रम्प यांनी PM मोदींना पाठवले स्पेशल गिफ्ट
| वर्ष - 9 | अंक -50 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- वर्ल्ड क्रिकेटमध्ये मोठा अपसेट!
- यशस्वी जैस्वालने घडवला इतिहास
- ‘त्यांच्यासाठी महिला माणूस नाहीत’
- हे सुरक्षित राज्याचं उदाहरण आहे?

www.mahaenews.com | रविवार, दि. 12 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## हंबरडा मोर्चा

## छत्रपती संभाजीनगरातून उद्धव ठाकरेंचा

# सरकारला घाम फोडणारा हंबरडा !

## उद्धव ठाकरे निवडणूकीसाठी कोणालाही सोबत घेतील, उद्या पाकिस्तानलाही सोबत घेतील- एकनाथ शिंदे

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**राज्याला अतिवृष्टीचा मोठा तडाखा बसला आहे, मराठवाड्यात तर पावसामुळे प्रचंड नुकसान झालं आहे, सरकारकडून अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी पॅकेजी घोषणा देखील करण्यात आली आहे, मात्र हे पॅकेज अतिशय कमी असल्याची टीका आता विरोधकांकडून होत आहे, या पार्श्वभूमीवर आज शिवसेना ठाकरे गटाचा छत्रपती संभाजीनगरमध्ये हंबरडा मोर्चा पार पडला, या मोर्चाला शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची उपस्थिती होती, या मोर्चात बोलताना त्यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. तर आगामी पालिका निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी आढावा बैठका सुरु केल्या आहेत. चेंबूर येथील अशा बैठकीला संबोधन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. उद्धव ठाकरे निवडणूकीसाठी कोणालाही सोबत घेतली. उद्या पाकिस्तानलाही सोबत घेतील अशी टीका शिंदे यांनी ठाकरे यांच्यावर केली आहे.**

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जाहीर झालेल्या मदतीवरून उद्धव ठाकरे यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. तुम्ही धार्मिक भावनेवर राजकारण करत आहात. लोकांचा जीव चालला आहे, त्यावर काहीच करत नाहीत. विरोधी पक्षनेतेपद नसलं तरी, शेतकऱ्यांच्या बांधावर अधिकारी आलाच पाहिजे. आम्ही शेतकऱ्यांसोबत आहोत. अधिकारी आला नाही तर शेतकऱ्यांचा आसूड काय असतो तो दाखवला पाहिजे. तुम्ही बाबूगिरी करू नका. शिवसेना पॅकेजवर लक्ष ठेवेल, असं यावेळी उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, दिवाळीच्या आधी पॅकेज द्या. मी दिवाळीनंतर महाराष्ट्रात फिरणार. प्रत्येकाला पैसे मिळाले की नाही हे बघेल. हाच शिवसेनेचा कार्यक्रम असेल. आम्ही गावागावात जाऊन शेतकऱ्यांना पॅकेज मिळवून द्यायला तयार आहोत. मला फक्त तुमचे आशीर्वाद हवेत, एकाने सांगितलं तुम्ही मुख्यमंत्री व्हा, मी म्हटलं मला फक्त आशीर्वाद द्या. मला मुख्यमंत्रिपदाची स्वप्न पडत नाहीत, पद नसताना शिवसेना तुमच्यासाठी रस्त्यावर उतरलीय. निवडणूक येईल आणि जाईल, पण जीव गेला तर मिळणार नाही. अस्मानी आणि सुल्तानी संकट आलं आहे. अस्मानी संकट हातात नाही, पण सुल्तानी संकटाचा सामना करणं आपल्या हातात आहे. आपण या संकटाचा सामना करू, असं यावेळी उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे, सरकारने आता जे पॅकेज जाहीर केलं आहे, ते फसवं पॅकेज आहे, असा आरोपही यावेळी उद्धव ठाकरे यांनी केला आहे.



## तोच आसूड उद्धव ठाकरेंनी स्वत:ला मारून घ्यावा

शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगर पालिकांच्या निवडणूकांसाठी मतदार संघ आढावा घ्यायला सुरुवात केली आहे. चेंबूर येथे घेतलेल्या आढावा बैठकीत त्यांनी शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. मी मुख्यमंत्री असताना सुद्धा उद्धव ठाकरे टीका करत होते. मला घटनाबाह्य मुख्यमंत्री म्हणत होते. निवडणूक आयोगाला शिव्या देत होते. आता आपण त्यांच्या आरोपांना कामातून उत्तर देणार आहोत. आपल्याला केवळ एकच ब्रँड माहिती आहे. तो म्हणजे बाळासाहेब ठाकरे हा होय असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चेंबूर येथील आढावा बैठकीत ठणकावून सांगितले.

आम्ही आमच्या कामातून विरोधकांना उत्तर देणार आहेत. आणि या केलेल्या कामाच्या जोरावर महायुती जिंकणार आहे. त्यांनी हबंरडा मोर्चा काढला आहे. आम्ही शेतकऱ्यांना मदतीचे पॅकेज जाहीर केलेले आहे. ते त्यांना माहिती नाही. हबंरडा फोडताना डोळ्यात आसू असतात, चेहऱ्यावर रडू असते. परंतू ते तर हसत होते. आणि हातात आसूड होता अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी उद्धव ठाकरे यांनी यावेळी केली. आपण गेल्यावेळी उत्तर पश्चिमचा आढावा घेतला होता. आज दक्षिण मध्य मुबईचा आढावा घेतोय. येथे ६ विधानसभा येतात. येथे आता वॉर्डनुसार बैठका होतील पदाधिकारी नेमणूका, मतदार याद्या याचा आढावा घेतला जाईल, निवडणूका शिवसेनेला नवीन नाहीत. मी मुख्यमंत्री असताना आम्ही मुंबईतील रस्त्यांचे कॉंक्रिटीटीकरण केले, रखडलेले प्रकल्प मार्गी लावले, आपला दवाखाना सुरू केला असे यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले.

ते पुढे म्हणाले की मुंबई हे जागतिक शहर आहे. ब्रिटनचे पंतप्रधान आले होते. काही करार ही केले. मुंबईचं महत्व मोठं आहे. आम्ही केलेल्या कामाची पोचपावती विधानसभेला मिळाली आणि आता पालिका निवडणूकीतही ती मिळेल. पद एक उमेदवार हा नियम आम्ही लावणार आहे. निवडणूकीत पद देत असताना काही महामंडळ, जिल्हा कमिठ्या इथे कार्यकर्त्यांना संधी नक्की मिळल असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी कार्यकर्त्यांना आश्वस्थ केले.

### उद्धव ठाकरे सत्तेसाठी उद्या काहीही करतील !

उद्धव ठाकरे सत्तेसाठी उद्या MIM काय तर पाकिस्तानलाही सोबत घेतील. निवडणूक जिंकण्यासाठी ते काहीही करू शकतात. मुंबईत इतके घोटाळे ठाकरेंनी केले आहेत की त्यांनी स्वत:वर आसूड मारून घ्यायला हवेत. त्यांनी मुंबईत केलेल्या चुकांसाठी स्वत:लाच आसुड मारुन घ्यायला हवा अशी जोरदार टीका शिंदे यांनी ठाकरे यांच्यावर केली.

### ब्रिटनच्या पंतप्रधानांनी शिंदे गटात प्रवेश केला की काय? उद्धव ठाकरे असं का म्हणाले?

आज छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेना ठाकरे गटाचा मोर्चा पार पडला, या मोर्चानंतर झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा शिवसेना शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला आहे.अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालं आहे, शासनाकडून शेतकऱ्यांना मदत देखील जाहीर करण्यात आली आहे, मात्र शासनानं जाहीर केलेलं हे पॅकेज अत्यंत कमी आणि फसवं असल्याची टीका आता विरोधकांकडून सुरू झाली आहे, या सर्व पार्श्वभूमीवर आज छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेना ठाकरे गटाचा मोर्चा पार पडला, या मोर्चानंतर आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलताना पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

### नेमकं काय म्हणाले उद्धव ठाकरे?

शेतकऱ्यांना पैसे का दिले जात नाहीत, पैशांची कमी वाटत असेल तर पीएम केअर फंडातून पैसे आणा, जुन्या पैशांची बेरीज करून हा आकडा तयार केला आहे, हे फसवं पॅकेज आहे. आम्ही त्यावेळी एनडीआरएफच्या निकषाच्यावर पॅकेज दिलं होतं, असं यावेळी उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. दरम्यान ब्रिटनच्या पंतप्रधानांच्या स्वागतासाठी लावण्यात आलेल्या बॅनरवरून देखील त्यांनी शिवसेना शिंदे गटावर निशाणा साधला आहे.

शहरभर त्यांनी होर्डिंग्ज लावली. बीकेसीत ब्रिटनचे पंतप्रधान आले होते.

डॉ. शशी थरूर यांची टिका

## काँग्रेसचे खासदार डॉ. शशी थरूर यांचे प्रतिपादन

# बहुसांस्कृतिकता ही देशाची ताकद!

## खऱ्या सामर्थ्याकडे दुर्लक्ष

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'भारतातील बहुसांस्कृतिकता आणि बहुभाषकता ही देशाची खरी ताकद आहे. सध्या मात्र 'एक राष्ट्र, एक निवडणूक, एक पक्ष, एक भाषा' याचीच चर्चा सुरू आहे. हा विचार देशाच्या खऱ्या सामर्थ्याकडे दुर्लक्ष करणारा आहे,' अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, खासदार डॉ. शशी थरूर यांनी केली.**



सिम्बायोसिस विद्यापीठाच्या वतीने 'शब्दांची किमया, कल्पना आणि प्रेरणा' या संकल्पनेवर आयोजित 'साहित्य महोत्सवा'च्या उद्घाटन कार्यक्रमात डॉ. थरूर बोलत होते. माजी राजदूत पवन वर्मा, विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार, प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमण, डॉ. श्वेता देशपांडे, अनिता अग्रवाल या वेळी उपस्थित होते. या वेळी डॉ. विद्या येरवडेकरलिखित '२०० मोटिव्हेशनल माइंड्ज' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.डॉ. थरूर म्हणाले, 'भारतीय तत्त्वज्ञानाने अंतिम सत्य स्वत:मध्ये शोधण्याचा मार्ग दाखवला आहे. स्वर्गाची संकल्पना मृत्यूनंतरच्या जीवनात सापडत नाही. ती आताच्या जीवनात पाहावी लागते. खरा स्वर्ग हा समाजातील सलोख्यात असतो. समाजातील सलोख्यासाठी विविधता गरजेची असते. आज ज्या गोष्टी घडवल्या आणि सांगितल्या जातील, त्यानेच उद्याच्या भारताला आकार मिळणार आहे.''सध्या अल्गोरिदम आणि विश्लेषणाचा काळ आहे. या युगात केवळ डेटाच आपल्याला मार्गदर्शन करू शकतो. डेटावर विश्वास ठेवणे सोपे असते. मात्र, तथ्ये सांगण्यासाठी संदर्भांची गरज असते. त्यासाठी सत्य सांगावे लागते. ते सांगण्यासाठी आपण इंग्रजीबरोबर मातृभाषेतून शिक्षण, ग्रंथालये, भाषांतरासारख्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे,' असेही डॉ. थरूर यांनी नमूद केले. ते म्हणाले, 'मुलांना केवळ 'कोडिंग' शिकवू नये. त्यांना सर्जनशीलतेचे धडे द्यावेत. कथाकथन ही चैनीची गोष्ट नसते. समाजाच्या जडणघडणीसाठी ती अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. जागतिक कल्पनांना साहित्य प्रोत्साहन देते. त्यातून समाज भावनेला आकार देणाऱ्या विविध प्रतिमांचा, प्रतिकांचा आणि कथांचा जन्म होतो. त्यामुळे मुलांमध्ये साहित्याची आवड निर्माण करणे गरजेचे आहे.' 'भारतातील बहुसांस्कृतिकता आणि बहुभाषकता ही देशाची खरी ताकद आहे. सध्या मात्र 'एक राष्ट्र, एक निवडणूक, एक पक्ष, एक भाषा' याचीच चर्चा सुरू आहे. हा विचार देशाच्या खऱ्या सामर्थ्याकडे दुर्लक्ष करणारा आहे,' अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, खासदार डॉ. शशी थरूर यांनी केली. सिम्बायोसिस विद्यापीठाच्या वतीने 'शब्दांची किमया, कल्पना आणि प्रेरणा' या संकल्पनेवर आयोजित 'साहित्य महोत्सवा'च्या उद्घाटन कार्यक्रमात डॉ. थरूर बोलत होते. माजी राजदूत पवन वर्मा, विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार, प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमण, डॉ. श्वेता देशपांडे, अनिता अग्रवाल या वेळी उपस्थित होते. या वेळी डॉ. विद्या येरवडेकरलिखित '२०० मोटिव्हेशनल माइंड्ज' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.डॉ. थरूर म्हणाले, 'भारतीय तत्त्वज्ञानाने अंतिम सत्य स्वत:मध्ये शोधण्याचा मार्ग दाखवला आहे. स्वर्गाची संकल्पना मृत्यूनंतरच्या जीवनात सापडत नाही. ती आताच्या जीवनात पाहावी लागते. खरा स्वर्ग हा समाजातील सलोख्यात असतो.सलोख्यासाठी विविधता गरजेची असते.

### डेटावर विश्वास ठेवणे सोपे असते

उद्याच्या भारताला आकार मिळणार आहे.''सध्या अल्गोरिदम आणि विश्लेषणाचा काळ आहे. या युगात केवळ डेटाच आपल्याला मार्गदर्शन करू शकतो. डेटावर विश्वास ठेवणे सोपे असते. मात्र, तथ्ये सांगण्यासाठी संदर्भांची गरज असते. त्यासाठी सत्य सांगावे लागते. ते सांगण्यासाठी आपण इंग्रजीबरोबर मातृभाषेतून शिक्षण, ग्रंथालये, भाषांतरासारख्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे,' असेही डॉ. थरूर यांनी नमूद केले.


# प्रेयसीचे दुसऱ्यासोबत नग्न फोटो पाहिले

## प्रियकराने चाकूने वार करून केली हत्या; हत्या केल्याचं कबूल केलं

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रेयसीच दुसऱ्या व्यक्तीसोबत असलेल्या प्रेमप्रकरणातून प्रियकराने तिची हत्या केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी वाकड पोलिसांनी दिलावर सिंग नावाच्या पंचवीस वर्षीय प्रियकराला अटक केली आहे. याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलावर सिंगच २०१९ पासून रीना (नाव बदलेल आहे) सोबत प्रेमसंबंध होते. परंतु, रीनाच इतर व्यक्तीसोबत प्रेम संबंध असल्याचा संशय आरोपी दिलावर याला होता. याप्रकरणी वाकड पोलिसांनी दिलावर सिंग नावाच्या पंचवीस वर्षीय प्रियकराला अटक केली आहे. याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.

रीना तिच्या दुसऱ्या प्रियकरा सोबत विवाह करणार होती. याबाबतची कुणकुण आरोपी दिलावर याला लागली होती. आज (शनिवार) रीनाला पिंपरी- चिंचवडमधील काळा खडक येथे असलेल्या लॉजवर आणलं. तिथे प्रेयसी रीनाचा मोबाईल तपासला. मोबाईलमध्ये रीना आणि दुसऱ्या प्रियकराचे नग्न फोटो आढळले. चिडलेल्या दिलावरने प्रेयसीवर चाकूने सपासप वार करून हत्या केली. हत्या करून थेट कोंढवा पोलीस ठाणे गाठले. पोलिसांना हत्या केल्याची माहिती देण्यात आली. हत्या केल्याचं कबूल केलं. कोंढवा पोलिसांनी याबाबतची माहिती वाकड पोलिसांना दिली. वाकड पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी केल्यानंतर प्रेयसीची हत्या केल्याचं समोर आलं. या घटने प्रकरण आरोपी दिलावर सिंगला पोलिसांनी अटक केली आहे.

### हत्या करून पोलीस ठाणे गाठले

याबाबतची कुणकुण आरोपी दिलावर याला लागली होती. आज (शनिवार) रीनाला पिंपरी- चिंचवडमधील काळा खडक येथे असलेल्या लॉजवर आणलं. तिथे प्रेयसी रीनाचा मोबाईल तपासला. मोबाईलमध्ये रीना आणि दुसऱ्या प्रियकराचे नग्न फोटो आढळले. चिडलेल्या दिलावरने प्रेयसीवर चाकूने सपासप वार करून हत्या केली. हत्या करून थेट कोंढवा पोलीस ठाणे गाठले.

## वाहतुकीला ‘रम्बलर’चा अडथळा — वाहने पंचर होऊन अपघाताची शक्यता

# खड्ड्यांमुळे रस्त्यांची चाळण!

## रस्त्यांवर प्लॅस्टिकचे रम्बलर तुटून खिळे बाहेर

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपंरी चिंचवड | प्रतिनिधी: शहरातील रस्त्यांची झालेली चाळण, अर्धवट राहिलेली कामे आणि जागोजागी टाकण्यात आलेले रम्बलर वाहतुकीस अडथळा ठरत आहेत. त्यातही बऱ्याच रस्त्यांवर प्लॅस्टिकचे रम्बलर बसविण्यात आले होते. आता, हे तुटून फक्त खिळे शिल्लक राहिले आहेत. हे खिळे धोकादायक ठरत असून, वाहने पंक्चर होऊन अपघाताची शक्यता आहे.**



रस्ते अपघातातील मृत्यू हा चिंतेचा विषय झाला असून, दिवसेंदिवस अपघातांची संख्या वाढताना दिसून येत आहे. बहुतांश वेळा अतिवेगाने वाहने चालविल्यामुळे वाहनांवरील नियंत्रण सुटल्याने अपघात झाल्याचे दिसून येत आहे. अपघात रोखण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग किंवा शहरातील अंतर्गत रस्त्यांवर वाहनांची गती कमी करण्यासाठी रम्बलर टाकले आहेत. तसेच तीव्र उतार, रुग्णालय, शाळा, महाविद्यालय, बाजारपेठ आदी वर्दळीच्या ठिकाणांच्या अगोदर वाहनांची गती कमी करण्यासाठी रम्बलर टाकले आहेत. काही रस्त्यांवर थर्मोप्लास्ट रम्बलर तर, काही ठिकाणी प्लॅस्टिकचे रम्बलर बसविण्यात आले आहेत. पण, यातील बहुतांश ठिकाणचे थर्मोप्लास्टचे रम्बलर एक ते दोन महिन्यांतच झिजले आहेत. त्यामुळे आता केवळ पांढरे पट्टे शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे कामाच्या दर्जावर चिन्ह उपस्थित होत आहे.

तसेच, रम्बलर निघून गेले असल्याने वाहनेही अतिवेगाने धावत आहेत. प्लॅस्टिकचे रम्बलरही तुटले असून, ते बसविण्यासाठी वापरलेले लोखंडी खिळे शिल्लक राहिले आहेत. हे खिळे संबंधित विभागाने काढणे अपेक्षित होते. पण, अजूनही रस्त्यांवर हे खिळे दिसून येत आहेत.

वाहनचालक अचानक खिळे दिसल्यामुळे वाहनांचा वेग कमी करतात.

त्यामुळे मागून वेगाने येणारी वाहने धडकून अपघात होण्याचा धोका आहे. तसेच, हे खिळे वाहनांचे चाके पंक्चर होण्यास कारणीभूत ठरत असून, मोठा अपघात होण्याचा धोका आहे. प्रशासनाने तत्काळ रस्त्यांवरील थर्मोप्लास्ट रम्बलर दुरुस्त करावेत व त्यासाठी लावलेले खिळे काढून टाकण्याची मागणी होत आहे.

### धोकादायक गतिरोधकांमुळे नागरिक त्रस्त

शहरातील वाढते अपघात रोखण्यासाठी अवजड वाहनांवर बंदीसह विविध उपाययोजना करण्यात येत आहे. तसेच वाहनांची गती कमी करण्यासाठी रस्त्यांवर गतिरोधक उभारण्यात आले आहेत. पण, गतिरोधके (स्पीडब्रेकर्स) ही इंडियन रोड्स कॉंग्रेसच्या (आयआरसी) मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे आणि बांधणीच्या निकषांप्रमाणे नसल्याचे दिसून येते. असमान व अधिक उंचीच्या गतिरोधकांमुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे आणि मणके, कंबर, मानदुखीच्या तक्रारी येत आहेत. बहुतांश गतिरोधकांवर काळ्या-पांढऱ्या रंगांच्या पट्ट्यांनी रंगवले नसल्यामुळे गतिरोधक दिसत नाहीत. परिणामी, वाहने गतिरोधकावरून उंच उडून खाली येत असल्याने अपघात होत आहेत. पालिका प्रशासन शहरातील धोकादायक गतिरोधकांचा सर्व्हे करून ते कधी काढून टाकणार? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

“रस्त्यावर काही ठिकाणी प्लॅस्टिकचे रम्बलर टाकले होते. ते तुटले असून खिळे शिल्लक राहिले आहेत. हे खिळे धोकादायक असून प्रशासनाने तत्काळ काढून टाकावेत.
**-विकास कदम,** नागरिक

““शहरातील काही रस्त्यांवर पावसाळ्यापूर्वी रम्बलर टाकले होते. पण, पावसामुळे काही ठिकाणचे निघून गेल्याच्या तक्रारी आहेत. लवकरच याच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल. तसेच, रम्बलरसाठी लावलेले खिळे काढून टाकण्यात येतील.
**-देवन्ना गट्टूवार,** सहशहर अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका

## पिंपरी महापालिकेचा ‘वेस्ट टू वंडर’ प्रकल्प ठरतोय आगळावेगळा

### कचऱ्याचा होतोय पर्यावरणपूरक वापर; महापालिकेकडून स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेकडून स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या अंतर्गत स्वच्छता मोहीम, आर.आर.आर सेंटर, शून्य कचरा प्रकल्प, वेस्ट टू वंडर, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक जीवन शैलीचा स्वीकार, जनजागृती असे अनेक अभिनव प्रयोग राबविले जात आहेत.**



हा प्रकल्प महापालिकेचा आरोग्य विभाग शहराच्या सौंदर्यात भर घालणारे उपक्रम सातत्याने राबवत आहे. त्यानुषंगाने अ क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक १० अंतर्गत इंदिरानगर, नाना-नानी पार्क, मोरवाडी, म्हाडा कॉलनी, शिवनेरी सोसायटी, अजिंठानगर, सुमन मॉल तसेच एमआयडीसी रोडवरील किशोर पंप कंपनी परिसरात आरोग्य विभागामार्फत ‘वेस्ट टू वंडर’ हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला आहे.,या उपक्रमांतर्गत कचऱ्यातील टाकाऊ वस्तूंचा वापर करून परिसराचे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. वापरात नसलेले पाईप, प्लास्टिकच्या बाटल्या, लाकूड, माठ, दगड आदी वस्तूंना कल्पकतेचा स्पर्श देत त्यातून आकर्षक कलाकृती तयार करण्यात आल्या आहेत. विविध रंगसंगती, रेखीव सजावट आणि भिंतींवरील अत्यंत कल्पकतेने रेखाटलेली चित्रांनी या परिसराचा संपूर्ण कायापालट केला आहे. एकेकाळी नागरिकांनी अस्ताव्यस्त टाकलेल्या कचऱ्याची जागा आता नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी ‘अ’ क्षेत्रीय सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक दत्तात्रय गणगे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक स्नेहा चांदणे, सहायक आरोग्य निरीक्षक कृष्णा राऊत तसेच, अन्य महापालिका कर्मचारी यांच्या प्रयत्नांमुळे कचऱ्यातून साकारलेली ही कला शहराच्या सौंदर्यात भर घालत आहे.

वेस्ट टू वंडर या अनोख्या उपक्रमामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक सार्वजनिक ठिकाणे उजळून निघाली आहेत. हा प्रकल्प फक्त कचरा व्यवस्थापनापुरता मर्यादित न राहता, शहराच्या सौंदर्याचे प्रतीक बनत आहे.

सार्वजनिक जागेवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी तेथे स्वच्छता करून तो परिसर टाकाऊ वस्तूंचा वापर करून कल्पकतेने सजवण्याचा उपक्रम आरोग्य विभागाने हाती घेतला आहे. या अंतर्गत शहरातील विविध सार्वजनिक जागा स्वच्छ व सुंदर करण्यात येत आहेत. नागरिकांनी देखील सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता त्या जागांची स्वच्छता राखण्यासाठी महापालिकेला सहकार्य करण्याची गरज आहे.
**-विजयकुमार खोराटे,**
अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका


पिंपरी चिंचवड शहर कचरामुक्त करण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सातत्याने विविध अभिनव उपक्रम राबवले जात असतात. वेस्ट टू वंडर ही संकल्पना अतिशय प्रभावीपणे राबवली जात असून स्वच्छतेबरोबर कलात्मकता व सुंदरता जपण्याचे काम आरोग्य विभागाकडून केले जात आहे.
**-सचिन पवार,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका




# लोकशाहीसाठी की नवउदारमतवाद

**व्हेनेझुएलामधील राजवटीला गेल्या २० वर्षांपासून विरोध करणाऱ्या मारिया कोरिना मचाडो यांना या वर्षाचे शांततेचे नोबेल पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. लोकशाही हक्कांच्या रक्षणासाठी, तसेच हुकूमशाहीतून लोकशाहीच्या स्थित्यंतरासाठी त्या घेत असलेल्या प्रयत्नांची दखल म्हणून हा पुरस्कार त्यांना देण्यात येत आहे.**

व्हेनेझुएलामधील राजकीय नेत्या मारिया कोरिना मचाडो यांना २०२५ चा शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर झाल्याने नवउदारमतवाद, लोकशाही शासन व्यवस्था यासंदर्भात काही मुद्दे नव्याने चर्चेला येत आहेत. खरे तर मानवी अभ्युदयासाठी अस्तित्वात असलेल्यांपैकी उत्तम मानली जाणारी राजकीय व्यवस्था म्हणजे लोकशाही. मात्र ती काही आपोआप टिकत नाही किंवा वृद्धिंगत होत नाही. नागरिकांना तिच्या वाढीसाठी प्रयत्नशील आणि रक्षणासाठी सतत जागृत राहावे लागते. ती सतर्कता दाखविली नाही तर लोकशाहीचे अस्तित्व कधीही धोक्यात येऊ शकते. इतिहासात कधी नव्हे ते आज लोकशाही धोक्यात येण्याची प्रक्रिया जगभर गतिमान होत असल्याचे दिसत आहे. विविध देशांमध्ये हुकूमशाही प्रवृत्तीचे राज्यकर्ते लोकशाही मार्गांनी सत्ता काबीज करून लोकशाहीचाच गळा घोटत आहेत.लोकशाहीच्या



पदराआड जगभर वाढत चाललेल्या एकाधिकारशाहीचे हे भयाण वास्तव ‘व्ही. डेम’च्या (व्हरायटीज ऑफ डेमोक्रसी) २०२४ च्या लोकशाहीविषयक अहवालात अधोरेखित होते. वर्तमानात जगातील ६८ टक्के जनता ही एकाधिकारशाही असलेल्या राजवटींमध्ये वास्तव्यास आहे, गेल्या दशकभरात उदारमतवादी लोकशाही राजवटी प्रकर्षाने कमी झाल्याच्या जाणवत आहेत, लोकशाही राष्ट्रांची संख्या ४३ वरून ३२ पर्यत खाली आली आहे. जगातील केवळ १४ टक्के लोकच लोकशाही राजवटींमध्ये सध्या राहत आहेत, तर केवळ ४ टक्के नागरिकांना लोकशाही वृद्धिंगत होण्याचा अनुभव येत आहे.

पूर्व युरोप, मध्य आशिया, लॅटिन अमेरिका या देशांमध्ये लोकशाहीची दिवसेंदिवस घसरण होत आहे. १९९० च्या दरम्यान तिची अवस्था जशी होती तशीच सध्या ती झाली आहे.

आज लोकशाहीला लष्करशाहीपासून नाही तर लोकशाही मार्गांनीच सत्ता मिळविणाऱ्या सामर्थ्यशाली नेत्यांपासून धोका निर्माण झाला आहे. लोकशाही मार्गांनी सत्तेवर आलेल्या राजवटींची वाटचाल एकाधिकारशाहीकडे होत असताना तेथील राज्यकर्ते कृतीतून किंवा शब्दांतून लोकशाहीचे नियम नाकारतात, विरोधकांना अधिमान्यता देत नाहीत, राज्यात होणारी हिंसा सहन करतात किंवा त्याला प्रोत्साहन देतात, विरोधकांच्या आणि प्रसारमाध्यमांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी करतात, अशा वेळी तिथे लोकशाहीचा मृत्यू होत असतो, असा निष्कर्ष ‘हाऊ डेमोक्रसीज डाय’ या ग्रंथामध्ये लेखकांनी काढला आहे.गेल्या चार दशकांमध्ये आशिया, लॅटिन अमेरिकेसहित अनेक खंडामध्ये लोकशाही राजवटी प्रस्थापित झाल्या. त्याचवेळी नवउदारमतवादाच्या प्रभावातून वित्तीय भांडवलावरील नियंत्रणे कमी करण्यात आली. त्याचाच परिणाम म्हणजे या वित्तीय भांडवलाच्या जगभरातील अनियंत्रित विस्तारामुळे विविध देशांमध्ये आर्थिक अरिष्टे निर्माण झाली. या अरिष्टांमुळे लोकशाहीतील आर्थिक आणि राजकीय संस्थांवरील सर्वसामान्य जनतेचा विश्वास कमी झाला. त्याखेरीज वित्तीय भांडवलाच्या विस्ताराने आर्थिक विषमताही जगभर वाढली. बदललेल्या अर्थ प्रारूपामुळे कामगारांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटाही कमी झाला आणि निवडणूक प्रक्रियेवर पडणाऱ्या त्यांच्या प्रभावालाही मर्यादा आल्या. आर्थिक अभिजनांनी प्रसारमाध्यमांना हाताशी धरून निवडणूक प्रक्रिया प्रभावित करून व्यवसायस्नेही राजकीय पक्षांना सत्तेवर आणले. हे प्रामुख्याने जबाबदार राहिलेले आहे. या प्रारूपाने १९८०च्या दशकात राष्ट्रांना आर्थिक धोरणे बदलविण्यास भाग पाडून देशातील उद्योग आणि भांडवल नियंत्रणमुक्त करायला भाग पाडले. मुक्त अर्थव्यवस्थेची धोरणं स्वीकारायला लावून कल्याणकारी राज्य संपुष्टात आणले. प्रत्येक मानवी गरज आणि इच्छा यांचे रूपांतर नफा मिळवून देणाऱ्या उद्योगात केले.

## प्रासंगिक »

### ‘बाहेरची’चे दुखणे!

***सर्व क्षेत्रांतील महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळीच्या दरवर्षी १२ पगारी रजा देणारे कर्नाटक हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे...***

सरकारी तसेच खासगी क्षेत्रातील महिलांसाठी ‘मासिक पाळीच्या रजा धोरण, २०२५’ला मान्यता देऊन ते लागू केल्याबद्दल कर्नाटक राज्य सरकारचे अभिनंदन. यामुळे आता सर्व क्षेत्रांतील महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळीच्या दरवर्षी १२ पगारी रजा देणारे कर्नाटक हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे. ही सुविधा देऊन कर्नाटक सरकारने एक पाऊल पुढे टाकले आहे.

यात शंका नाही. कारण मासिक पाळीदरम्यान महिलांना रजा दिली जावी, ही भारतातीलच नाही तर जगभरातील स्त्रीवादी चळवळीची बऱ्याच आधीपासूनची मागणी आहे. तिची सुरुवात १९२० दरम्यान जपानमध्ये झाली. तिथे ती १९४७ पासून प्रत्यक्ष लागू झाली. त्यानंतर पुढच्या ५० वर्षांमध्ये इंडोनेशिया, तैवान, दक्षिण कोरिया या देशांनी महिलांना ही रजा देण्यास सुरुवात केली. २०२३ मध्ये स्पेनने अशी रजा देणारे पाऊल उचलले.

मराठ्यांना शांत करण्यात सध्या तरी सरकारला यश मिळाल्याचे दिसते आहे. परंतु अधिसूचनेच्या मसुद्यामार्फत जात ओळख निर्माण करण्याचा जो नवीन मार्ग आखण्यात आला आहे, त्यामुळे सत्ताधारी मराठ्यांच्या हाती ओबीसी प्रवर्गात घुसखोरी करण्याचे शक्तिशाली साधन प्राप्त झाल्याने ओबीसींमध्ये अस्वस्थता निर्माण झालेली आहे.

# मराठ्यांचे कुणबीकरण यशस्वी कसे होणार?

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ‘मसुदा अधिसूचनेद्वारे’ कुणबी जातीच्या ओळखीची नोंद असलेल्या मराठ्यांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षणाची घोषणा करून नवी मुंबईत येऊन थडकलेल्या भव्य मराठा मोर्चाचा समारोप करण्यात आला. पुन्हा १० फेब्रुवारीपासून उपोषण सुरू केल्यामुळे दिसते. अधिसूचना मसुदयाच्या अंमलबजावणीसाठी हे उपोषण आहे आणि मराठ्यांच्या आरक्षणाला विरोध केल्यास मंडल आयोगाच्या अहवालाला आव्हान देण्याचा इशारा देण्यात आला आहे. ओबीसी आरक्षणाची मराठ्यांची मागणी १९९०च्या दशकापासून, शेती-अरिष्ट, जमिनीचे तुकडीकरण, रोजगाराचे प्रश्न आणि नव-उदारमतवादी आर्थिक धोरणांचे आक्रमण यामुळे सामाजिक-आर्थिक विषमतेचे स्वरूप अधिक गंभीर रूप धारण करू लागल्याने, आणि मराठ्यांना त्याची झळ बसू लागल्याने मराठ्यांनी पुन्हा एकदा आपण ‘मूळ कुणबी’ असल्याचा दावा करत ओबीसी




दर्जा मिळविण्याचा प्रयत्न केला. या समस्यांना प्रतिसाद देत नोकरी आणि शिक्षणात महाराष्ट्र सरकारने मराठ्यांसाठी वेगळे आरक्षण देऊ केले. तथापि सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये मागासवर्गीय आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याचे कारण देत मराठ्यांना आरक्षण नाकारले. मग वेगळ्या आरक्षणाची मागणी बाजूला ठेवून थेट ओबीसी कोट्यात (१९%) कुणबी असल्याचा दावा करत आरक्षणाची मागणी मराठ्यांनी केली. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये जरांगे-पाटील यांनी पहिल्यांदा, निजाम काळात कुणबी नोंदी असलेल्या मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळावे यासाठी उपोषण सुरू केले. नंतर, या मागणीचे स्वरूप बदलले आणि संपूर्ण महाराष्ट्रात इंग्रजांच्या काळात कुणबी नोंदी असलेल्या मराठ्यांना आरक्षण मिळावे अशी मागणी होऊ लागली. अखेरीस, संपूर्ण राज्यभरातील ‘सरसकट’ मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळावे अशी मागणी रेटून करण्यात आली. म्हणूनच इथे प्रथमतः मराठा-कुणबी जातीच्या समूहाच्या इतिहासाचा संक्षिप्त आढावा घेणे आवश्यक आहे. मराठा साम्राज्यातून पुढे आलेल्या मराठा या प्रादेशिक ओळखीचे रूपांतर ब्रिटिश काळात एका जातीत झाले. सुरवातीला जेव्हा ब्रिटिशांनी त्यांचे रेस (वंश) किंवा ट्राईब असे वर्गीकरण केले तेव्हा त्यांनी मराठ्यांमध्ये दोन वर्ग पहिले – शहाण्णव कुळी मराठ्यांचा अभिजन राजेशाही वर्ग आणि आणि पशुपालक आणि शेतकरी कुणबी जातींनी बनलेला सामान्य वर्ग. शेती हा व्यवसाय अनेक जाती करत असल्यामुळे कुणबी जातीत इतर खालच्या जातींनी समाविष्ट होणे शक्य होत आलेले आहे. हेच विधान मराठा जातीसाठीही लागू होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## भिंगारमध्ये कडकडीत बंद

## आक्षेपार्ह पत्रके भिरकावल्याच्या घटनेचा निषेध

# नगरमध्ये शिवशक्ती- भीमशक्तीचा मोर्चा!

## शिवशक्ती- भीमशक्तीचा जनआक्रोश

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरात आक्षेपार्ह पत्रके भिरकावल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी शिवशक्ती-भीमशक्तीचा जनआक्रोश मोर्चा उद्या, रविवारी शहरात काढण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार संग्राम जगताप, ॲड. वाल्मीक निकाळजे व इतर हिंदुत्ववादी या मोर्चात सहभागी होणार आहेत. दरम्यान याच घटनेच्या निषेधार्थ आज, शनिवारी दुपारपर्यंत भिंगारमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. दरम्यान दोन दिवसांपूर्वी एमआयएमचे पक्षप्रमुख खासदार असदुद्दीन ओवैसी यांची नगरमध्ये सभा झाली.**



या सभेत एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यासह इतर नेत्यांनी आमदार जगताप व भाजपचे मंत्री नितेश राणे यांच्यावर जोरदार टीका केली. या वक्तव्याला जगताप व राणे यांच्या आक्रमक हिंदुत्ववादी भूमिकेचा संदर्भ होता. त्यामुळे एमआयएमच्या आरोपांना जगताप काय प्रत्युत्तर देतात हे समारोपाच्या मोर्चा सभेत स्पष्ट होईल.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर असलेले कागद शहरातील उड्डाणपुलावरून भिरकावण्यात आले होते. शहरातील इम्पिरियल चौकात ही घटना घडली. कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने एकास अटक केली.या पार्श्वभूमीवर अवमानकारक लिखाणाच्या निषेधार्थ शिवशक्ती-भिमशक्तीचा जनआक्रोश मोर्चा उद्या काढला जाणार आहे. सकाळी ११ वा. जुन्या बस स्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यापासून या मोर्चास सुरुवात होईल. बाजार समिती चौकातील आंबेडकर स्मारकास अभिवादन करून माळीवाडा, पंचपीर चावडी, आशा टॉकीज चौक, तख्ती दरवाजा, माणिक चौक, कापड बाजार, तेलीखुंट, चितळे रस्ता, चौपाटी कारंजामार्गे दिल्लीगेट वेशीजवळ समारोप व सभा होणार आहे.दोन दिवसांपूर्वी एमआयएमचे पक्षप्रमुख खासदार अससुद्दीन ओवैसी यांची नगरमध्ये सभा झाली. या सभेत एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यासह इतर नेत्यांनी आमदार जगताप व भाजपचे मंत्री नितेश राणे यांच्यावर जोरदार टीका केली. या वक्तव्याला जगताप व राणे यांच्या आक्रमक हिंदुत्ववादी भूमिकेचा संदर्भ होता. त्यामुळे एमआयएमच्या आरोपांना जगताप काय प्रत्युत्तर देतात हे समारोपाच्या मोर्चा सभेत स्पष्ट होईल.आमदार संग्राम जगताप यांच्या आक्रमक हिंदुत्ववादी भूमिकेवरून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाराजी व्यक्त करत जगताप यांना कारणे दाखवा नोटीस बजावणार असल्याचे आज, शनिवारी पुण्यात बोलताना जाहीर केले. अजित पवार यांच्या या भूमिकेवर जगताप यांनी कोणती प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. जनआक्रोश मोर्चाच्या समारोप सभेत ते याबाबत कोणती भूमिका घेतात, याकडे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे लक्ष राहणार आहे.या सभेत एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यासह इतर नेत्यांनी आमदार जगताप व भाजपचे मंत्री नितेश राणे यांच्यावर जोरदार टीका केली. या वक्तव्याला जगताप व राणे यांच्या आक्रमक हिंदुत्ववादी भूमिकेचा संदर्भ होता. त्यामुळे एमआयएमच्या आरोपांना जगताप काय प्रत्युत्तर देतात हे समारोपाच्या मोर्चा सभेत स्पष्ट होईल.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर असलेले कागद शहरातील उड्डाणपुलावरून भिरकावण्यात आले होते. शहरातील इम्पिरियल चौकात ही घटना घडली. कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने एकास अटक केली.या पार्श्वभूमीवर अवमानकारक लिखाणाच्या स्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यापासून या मोर्चास सुरुवात होईल.

### आज काढण्यात येणार मोर्चा

बाजार समिती चौकातील आंबेडकर स्मारकास अभिवादन करून माळीवाडा, पंचपीर चावडी, आशा टॉकीज चौक, तख्ती दरवाजा, माणिक चौक, कापड बाजार, तेलीखुंट, चितळे रस्ता, चौपाटी कारंजामार्गे दिल्लीगेट वेशीजवळ समारोप व सभा होणार आहे.दोन दिवसांपूर्वी एमआयएमचे पक्षप्रमुख खासदार अससुद्दीन ओवैसी यांची नगरमध्ये सभा झाली.

# ‘आपत्तीग्रस्त’साठी राजकीय दबाव

## 56 तालुक्यांचा समावेश, 35 तालुके मागे घेण्याचीही नामुष्की

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकारची मदत सर्वांपर्यंत पोहोचविताना राजकीय दबावातून नैसर्गिक आपत्तीग्रस्त तालुक्यांच्या संख्येत ५६ तालुक्यांनी वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, तर अतिवृष्टीचा फटका बसलेला नसतानाही कोकणातील ३० आणि पुणे जिल्ह्यातील ५ असे ३५ तालुके आपत्तीग्रस्त म्हणून घोषित करण्याचा निर्णय अवघ्या २४ तासांत सरकारने मागे घेतला आहे.**

त्यामुळे पालघरमधील तीन तालुके वगळता कोकणातील अन्य कोणत्याही तालुक्यांचा समावेश झालेला नाही. राज्यात अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे जून ते ऑगस्ट दरम्यान २६.६९ लाख हेक्टर क्षेत्राचे तर सप्टेंबर महिन्यात ६५ लाख हेक्टरवरील शेत पिकांचे नुकसान झाले. अतिवृष्टी आणि पुरामुळे ३१ जिल्ह्यांतील २५३ तालुके बाधित झाल्याची घोषणा करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी या तालुक्यातील बाधितांसाठी ३१,६२८ कोटींचे मदत पॅकेज जाहीर केले. त्यानुसार मदत आणि पुनर्वसन विभागाने ९ ऑक्टोबरला आपत्तीग्रस्त तालुक्यांची



जिल्हानिहाय यादी जाहीर केली. ही यादी जाहीर होताच मंत्री व आमदारांकडून आपापल्या विभागातील तालुक्यांचा समावेश करण्याचा आग्रह धरण्यात आला. तसेच काही तालुक्यांचा समावेश झाल्याबद्दल आक्षेप घेण्यात आला.दिवाळीनंतर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची निवडणूक जाहीर होणार असल्याने महायुतीतील घटक पक्षांच्या आमदारांनी आपापल्या तालुक्यांचा समावेश करण्यावर भर दिला.अतिवृष्टी आणि पुराने नांदेड जिल्ह्याला मोठा फटका बसला असतानाही या जिल्ह्यातील एकाही तालुक्याचा आपत्तीग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश नव्हता, तर कोकण आणि पुणे जिल्ह्यातील काही तालुक्यांत अतिवृष्टी वा पूर आलेला नसतानाही तेथील तालुक्यांचा यादीत समावेश करण्यात आला. त्यावरून राजकीय काहूर उठल्यानंतर तसेच अनेक भागातील लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपानंतर शुक्रवारी मध्यरात्री आपत्तीग्रस्त तालुक्यांची यादी नव्याने जाहीर करण्यात आली. यात २९ जिल्ह्यांतील अंशतः बाधित ३१ तर पूर्णतः बाधित २५१ अशा २८२ आपत्तीग्रस्त तालुक्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

### १५ तालुके आपत्तीग्रस्त घोषित

नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांसह ५६ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.त्यात आता ९ तालुक्यांची भर टाकण्यात आली असून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे पालकमंत्री असलेल्या अमरावती जिल्ह्यातही पूर्वी ६ आणि आता ९ असे १५ तालुके आपत्तीग्रस्त घोषित झाले.

## कोलकाता बलात्कार प्रकरण

## आर.जी. कर पीडितेच्या वडिलांचा सवाल

# हे सुरक्षित राज्याचं उदाहरण आहे?

### डॉक्टरवर बलात्कार झाल्याची घटना



।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पश्चिम बंगालच्या पश्चिम वर्धमान जिह्यातील दुर्गापूर येथील खासगी वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीवर शुक्रवारी रात्री तिच्याच महाविद्यालयाच्या संकुलात बलात्कार करण्यात आल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणी अद्याप कुणालाही अटक झाली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली. २०२४ मध्ये घडलेल्या आरजी कार वैद्यकीय महाविद्यालय आणि यावर्षी विधी महाविद्यालयात घडलेल्या बलात्कार प्रकरणानंतर पुन्हा एकदा महाविद्यालयातच अशाप्रकारची घटना घडल्यामुळे चिंता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान आर. जी. कर महाविद्यालयातील पीडितेच्या वडिलांनी या प्रकरणी प्रतिक्रिया दिली आहे.**

आर.जी. कर रुग्णालयात एका डॉक्टरवर बलात्कार झाल्याची घटना मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात घडली होती. या प्रकरणातील पीडितेच्या वडिलांनी इंडियन एक्स्प्रेसला प्रतिक्रिया दिली, "आज पुन्हा एकदा सामूहिक बलात्काराची घटना समोर आली आहे. सुरक्षित राज्याचं हे उदाहरण आहे का? ज्या मुलीवर बलात्कार झाला ती मुलगी तिचं करिअर करायला आपल्या राज्यात आली होती. तिने डॉक्टर होऊन लोकांची सेवा करण्यासाठी आपल्या राज्यातल्या महाविद्यालयात एमबीबीएसला प्रवेश घेतला होता. मात्र तिच्यावर बलात्कार झाला. तिच्या स्वप्नांचा चुराडा झाला. ती जिवंत आहे पण तिला किती मोठा धक्का बसला असेल हे मी समजू शकतो." असं म्हणत पीडितेच्या वडिलांनी प्रतिक्रिया दिली आहे. कोलकाता येथील आर.जी.कर महाविद्यालय आणि रुग्णालयात एका महिला डॉक्टरवर बलात्कार करुन तिची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. या घटनेने संपूर्ण देश हादरला होता. तसंच या रुग्णालयातील महिला डॉक्टरांनी पीडितेच्या सहकाऱ्यांनी संप पुकारला होता आणि या प्रकरणात कठोर कारवाईची मागणी केली होती. पोलिसांनी या प्रकरणातल्या आरोपीला अटक केली. त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. दरम्यान आता पुन्हा एकदा एमबीबीएसला शिकणाऱ्या एका मुलीवर बलात्कार झाला आहे. या घटनेनंतर पश्चिम बंगाल पुन्हा सुन्न झाला आहे. या प्रकरणानंतर आर.जी. कर महाविद्यालय आणि रुग्णालय बलात्कार आणि हत्या प्रकरणातील पीडितेच्या वडिलांनी हे सुरक्षित राज्य आहे का? असा प्रश्न विचारत प्रतिक्रिया दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी मुळची ओडिशाची राहणारी आहे. शुक्रवारी रात्री ती तिच्या मित्रासह संकुलाच्या बाहेर आली होती. तेव्हा तिला काही जणांनी संकुलाच्या मागे असलेल्या झुडुपात ओढत नेले आणि लैंगिक अत्याचार केला. पोलिसांना याची माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पीडितेला रुग्णालयात दाखल केले. पीडितेला गंभीर दुखापत झाली असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.राजधानी कोलकातापासून १७० किमी अंतरावर असलेले दुर्गापूर हे पश्चिम बंगालमधील सर्वात मोठे औद्योगिक केंद्र आहे. अशा महत्त्वाच्या शहरात ही घटना घडल्यामुळे राज्यात पुन्हा एकदा खळबळ उडाली असून महिलांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.आर.जी. कर रुग्णालयात एका डॉक्टरवर बलात्कार झाल्याची घटना मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात घडली होती. या प्रकरणातील पीडितेच्या वडिलांनी इंडियन एक्स्प्रेसला प्रतिक्रिया दिली, "आज पुन्हा एकदा सामूहिक बलात्काराची घटना समोर आली आहे. सुरक्षित राज्याचं हे उदाहरण आहे का? ज्या मुलीवर बलात्कार झाला ती मुलगी तिचं करिअर करायला आपल्या राज्यात आली होती. तिने डॉक्टर होऊन लोकांची सेवा करण्यासाठी आपल्या राज्यातल्या महाविद्यालयात एमबीबीएसला प्रवेश घेतला होता. मात्र तिच्यावर बलात्कार झाला. तिच्या स्वप्नांचा चुराडा झाला. असं म्हणत पीडितेच्या वडिलांनी प्रतिक्रिया दिली आहे. कोलकाता येथील आर.जी.कर महाविद्यालय आणि रुग्णालयात एका महिला डॉक्टरवर बलात्कार करुन तिची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली.

### पीडितेचे वडील काय म्हणाले?

या प्रकरणात कठोर कारवाईची मागणी केली होती. पोलिसांनी या प्रकरणातल्या आरोपीला अटक केली. त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. दरम्यान आता पुन्हा एकदा एमबीबीएसला शिकणाऱ्या एका मुलीवर बलात्कार झाला आहे. या घटनेनंतर पश्चिम बंगाल पुन्हा सुन्न झाला आहे. या प्रकरणानंतर आर.जी. कर महाविद्यालय आणि रुग्णालय बलात्कार आणि हत्या प्रकरणातील पीडितेच्या वडिलांनी हे सुरक्षित राज्य आहे का? असा प्रश्न विचारत प्रतिक्रिया दिली आहे

## 'त्यांच्यासाठी महिला माणूस नाहीत'

## पत्रकारांनी या पत्रकार परिषदेवर बहिष्कार टाकायला हवा होता



।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तालिबानचे नेते आणि अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी भारत दौऱ्यावर आले आहेत. शुक्रवारी त्यांनी भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याबरोबर बैठक घेतल्यानंतर पत्रकार परिषदेला संबोधित केले. दिल्लीत झालेल्या या पत्रकार परिषदेला महिला पत्रकारांना उपस्थित राहण्यास परवानगी दिली नाही. या घटनेनंतर आता भारत सरकारवर विरोधक टीका करत आहेत.**

दरम्यान निर्वासित बांगलादेशी लेखिका आणि महिलांच्या अधिकारासाठी आवाज उचलणाऱ्या तस्लीमा नसरीन यांनी यावरून तालिबानच्या राजवटीवर टीका केली.१९९४ साली बांगलादेशमधून बाहेर पडलेल्या तस्लीमा नसरीन भारतात आल्या. महिलांच्या हक्क आणि अधिकारासाठी त्या नेहमीच पुढाकार घेत असतात. दिल्लीमधील पत्रकार परिषदेत महिला पत्रकारांना आत प्रवेश दिला नाही.

या घटनेवर बोलताना त्या म्हणाल्या, तालिबान महिलांना मानवी हक्क देण्यास तयार नाही. कारण ते महिलांना माणूस मानतच नाहीत.यावेळी दिल्लीत तालिबानी नेत्यांच्या पत्रकार परिषदेला उपस्थित राहिलेल्या पुरूष पत्रकारांवरही त्यांनी टीका केली. त्या म्हणाल्या, जर त्यांच्यात थोडा जरी विवेक असता तर त्यांनी पत्रकार परिषदेत न जाण्याचा निर्णय घेतला असता. तस्लीमा नसरीन पुढे म्हणाल्या, अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री भारतात येऊन पत्रकार परिषद घेतात आणि ते भारताच्या महिला पत्रकारांना पत्रकार परिषदेत येऊ देत नाहीत.

### महिलांना मानवी हक्क नाकारले

तालिबानच्या इस्लाममध्ये, महिलांना फक्त घरात राहणे, मुले जन्माला घालणे आणि त्यांच्या पतीची व मुलांची सेवा करणे एवढेच काम आहे. महिलाद्वेषी पुरुष महिलांना घराबाहेर पडू देत नाहीत. अफगाणिस्तानमध्ये मुलींना शाळेत जाण्यास बंदी, महिलांना बाहेर काम करण्यास परवानगी नाही. तालिबानी महिलांना मानवी हक्क देण्यास तयार नाहीत, कारण ते महिलांना मानव मानत नाहीत. महिलाद्वेषावर उभे राहिलेले राज्य हे क्रूर राज्य आहे.

# 'ठरलं तर मग' मालिका पुन्हा अव्वलस्थानी!

'ठरलं तर मग' मालिकेत अर्जुन-सायलीचं पुन्हा एकदा लग्न झालं असून, दोघंही सुभेदारांच्या घरात आपलं स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचं पाहायला मिळत आहे. अर्जुन-प्रियाच्या लग्नात सायली अचानक एन्ट्री घेते आणि आपल्याच नवऱ्याशी पुन्हा एकदा लग्न करते. मात्र, या लग्नापासून सुभेदार आनंदी नसतात. ते सायलीला घरातून हाकलून लावतात, तिचा गृहप्रवेश करत नाहीत. पण, अर्जुन तिला घरात घेऊन येतो. आपल्या बायकोला पुन्हा एकदा मानाचं स्थान मिळवून द्यायचं असा निश्चय अर्जुनने केलेला आहे. गेल्या काही दिवसांपासून 'ठरलं तर मग' मालिकेत नवनवीन ट्विस्ट आल्याचं पाहायला मिळालं. यामुळे प्रेक्षकांच्या मनात सुद्धा आता पुढे काय होणार याबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती. याशिवाय आता ही मालिका अर्धा तास प्रसारित न करता रोज ८:१५ ते ९:०० अशी पाऊणतास प्रक्षेपित केली जाते. या सगळ्याचा सकारात्मक परिणाम मालिकेच्या टीआरपीवर झाला. 'ठरलं तर मग' मालिकेला पुन्हा एकदा रेकॉर्ड ब्रेकिंग टीआरपी मिळाला आहे. 'ठरलं तर मग' मालिका गेल्या काही आठवड्यांमध्ये टीआरपीच्या शर्यतीत दुसऱ्या स्थानी गेली होती. पण, मालिकेच्या टीमने भरपूर मेहनत घेऊन पुन्हा एकदा त्यांचं अव्वलस्थान पटकावलं आहे. 'ठरलं तर मग' मालिकेला गेल्या आठवड्यात ७ टीआरपी रेटिंग मिळालं आहे. सध्याच्या काळात टेलिव्हिजन मालिकेला ७ रेटिंग मिळणं ही मोठी गोष्ट आहे. त्यामुळे सर्व स्तरांतून 'ठरलं तर मग'वर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# 'चला हवा येऊ द्या'मध्ये भाऊ कदम पुन्हा येणार?



'चला हवा येऊ द्या' हा विनोदी कार्यक्रम गेली वर्षानुवर्षे रसिक प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. काही महिन्यांपूर्वीच हा शो आधीपेक्षा एका नव्या रुपात प्रेक्षकांच्या भेटीला आला. मात्र, यंदा शोमध्ये एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. तो म्हणजे, डॉ. निलेश साबळेऐवजी यंदा अभिनेता अभिजीत खांडकेकर 'चला हवा येऊ द्या'चा होस्ट म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. याचबरोबर प्रेक्षक एका खास अभिनेत्याला या शोमध्ये मिस करत आहेत त्यांचं नाव आहे भाऊ कदम. गेली अनेक वर्षे विनोदाचं अचूक टायमिंग साधत रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे लोकप्रिय अभिनेते म्हणून भाऊ कदम यांना ओळखलं जातं. सलग १० वर्षं ते 'चला हवा येऊ द्या' या टीमचा एक महत्त्वपूर्ण भाग होते.

# तुम नज़रें ठीक करो!



प्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी ही सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करत असते. हेमांगीच्या 'बाई, बुब्स आणि ब्रा' या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधलं होते. हेमांगी विविध विषयांवर आधारित पोस्ट शेअर करत असते. आता हेमांगीनं जागतिक महिला दिनानिमित्त खास पोस्ट शेअर केली आहे. हेमांगीनं या पोस्टमध्ये स्वत:चा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये हेमांगी ही खिडकीच्या बाहेर दिसताना दिसत आहे. हेमांगीनं तिच्या या फोटोला खास कॅप्शन देखील दिलं आहे. या कॅप्शनमध्ये तिनं परीतोष त्रिपाठी यांची कविता लिहिली आहे. या कवितेनं अनेकांचे लक्ष वेधलं आहे.पुढे हेमांगीनं पोस्टमध्ये लिहिलं, "परीतोष त्रिपाठी जियो! कल के दौरान आपने ये पंक्तियां पेश की और मेरी आंखें भर आयी. इसमें वो हर एक शब्द है, है, जो मैं पिछले कुछ दिनों से कहना चाहती थी, जोर जोर से चिल्लाना चाहती थी! कुछ लोगों के लिए औरतों की किसी भी क्षेत्र में पायी गयी कोई मायने ही नहीं रखती. ऐसे लोग सिर्फ और सिर्फ उसने कपडे क्या पहने हैं, कैसे पहने हैं इस बात पर वक्त निकाल निकाल के बाते करते हैं, करते हैं, अपना और दुसरों का वक्त जाया करते हैं!के जरीए संस्कृती और सभ्यता के नाम पर हमें फिरसे गुलाम, कमजोर बनाना चाहते हैं!

# नम्रताने सांगितला 'तो' अनुभव

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमातून आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे नम्रता संभेराव. नम्रताने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं. आता ती वेगवेगळ्या चित्रपटात, नाटकात विविधांगी भूमिका साकारताना दिसत आहे. नुकतीच नम्रता संभेरावने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये तिने 'झी चित्र गौरव २०२५'चा सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाल्यानंतरचा अनुभव लिहीला आहे. नम्रता संभेरावने पुरस्काराबरोबरचे काही फोटो शेअर करत लिहिलं आहे, "...आणि ते 'झी चित्र गौरव'चं गाणं वाजलं माझ्यासाठी, सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्री नम्रता संभेराव चित्रपट 'नाच गं घुमा' त्या क्षणी पोटात गोळा आला. आनंद, सुख, समाधान सगळं एकवटून आलं. हे लहानपणी टीव्हीवर बघितलं होतं, कोणाला पारितोषिक मिळालं की डोळ्यात पाणी यायचं. मग ते अनोळखी असलं तरी आणि तो दिवस माझ्या आयुष्यात आला."पुढे नम्रताने लिहिलं की, भरत जाधव सरांनी नाव पुकारलं नमु, अंगावर सरसरून काटा आला. विनोदाचे महारथी भरत जाधव सरांकडून मला पुरस्कार मिळाला, खूपच भारी वाटलं. समोर विनोदाचे बाप बसले होते, अशोक सराफ, सचिन पिळगांवकर, महेश कोठारे काय बोलावं साठवून ठेवावा असा क्षण. २० वर्ष झाली, सिने नाट्यसृष्टीत छोट्या मोठ्या भूमिका करत इथंवर पोहोचले. गर्दीतून हळूहळू अनेक अनुभवांसह शिकत स्वतःला पुढे ढकलत आज प्रमुख भूमिकेसाठी बक्षीस मिळवलं. प्रामाणिकपणे कलेवर प्रेम केलं, करत राहीन."'झी चित्र गौरव'च्या सर्व परीक्षकांचे मनापासून आभार. आशाच्या भूमिकेसाठी ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला ते म्हणजे परेश मोकाशी, मधुगंधा कुलकर्णी या दोन अत्यंत हुशार हरहुन्नरी व्यक्तींनी. तुमचे सुद्धा खूप खूप आभार. मुक्ता ताई माझं प्रेरणास्थान तुझेही आभार. 'नाच गं घुमा'च्या सगळ्या समूहाचे, निर्मात्यांचे मनापासून आभार. या सगळ्यात तुमचाही मोठा वाटा आहे आणि प्रेक्षकांचे देखील मनापासून आभार," असं नम्रता संभेरावने लिहिलं.दरम्यान, नम्रता संभेरावच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ती लवकरच प्रदर्शित होणाऱ्या प्रसाद खांडेकर दिग्दर्शित 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटात झळकणार आहे. २८ फेब्रुवारीला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात तिचा कॅमिओ असणार आहे. याशिवाय दुसऱ्या बाजूला तिच्या 'थेट तुमच्या घरातून' नाटकाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या नाटकात नम्रतासह प्रसाद खांडेकर, ओंकार राऊत, शिवाली परब, प्रथमेश शिवलकर आणि भक्ती देसाई आहे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमातून आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे नम्रता संभेराव. नम्रताने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं.

# जिनिलीयाच्या व्हिडीओवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया

अभिनेता रितेश देशमुखव जिनिलीया देशमुख हे महाराष्ट्राचे लाडके दादा वहिनी आहेत. चाहते त्यांना दादा वहिनी असे म्हणताना दिसतात. या सेलेब्रिटी जोडप्याचा चाहतावर्ग मोठा आहे. चित्रपटांबरोबरच त्यांच्या सोशल मीडियावरील व्हिडीओंना प्रेक्षकांचे प्रेम मिळताना दिसते. ते अनेकदा विनोदी रीलमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करतात. आता हे जोडपे एका रीलच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या या रीलवर अनेक चाहत्यांनी अनेक कमेंट केल्या आहेत. रितेश देशमुख व जिनिलीया देशमुख यांनी सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. यावर लग्न म्हणजे काय? असे लिहिलेले दिसत आहे. जिनिलीया रितेशला म्हणते, "अहो लग्न म्हणजे काय हो?", त्यावर रितेश म्हणतो, "अगं लग्न म्हणजे घोड्यावर बसून केलेला गाढवपणा", या वाक्यानंतरच्या त्याच्या चेहऱ्यावरील हावभाव लक्ष वेधून घेत आहेत. तो घाबरल्याचे दिसत आहे. तर जिनिलीया त्याच्याकडे डोळे मोठे करून बघत असल्याचे दिसत आहे. शेवटी 'काय मी बोलून गेलो'हे गाणे ऐकायला मिळत आहे. रितेश-जिनिलीयच्या या व्हिडीओवर चाहत्यांनी मजेशीर कमेंट केल्याचे पाहायला मिळत आहे.रितेश-जिनिलीयाच्या या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका नेटकऱ्याने, "आता काही खरं नाही", असे म्हणत हसण्याच्या इमोजी शेअर केल्या आहेत. दुसऱ्या एका नेटकऱ्याने कमेंट करीत लिहिले, "आजचा दिवस जाउद्या वाहिनी", आणखी एका नेटकऱ्याने म्हटले, "आता सुट्टी नाही", असे म्हणत हसणाऱ्या इमोजी शेअर केल्या आहेत. अनेक नेटकऱ्यांनी आणखी काही मजेशीर कमेंट केल्या आहेत. "भाऊ आज उपाशी झोपणार", "दादाचं काही खर नाही हो आता","रितेश भाऊ जेवायला मिळतंय ना", "दादा आता जेवण विसरा", "आज जेवण मिळणार नाही", "खतम टाटा बाय बाय", अशा भन्नाट कंमेट्स पाहायला मिळणार आहे.चाहत्यांसह काही कलाकारांनीदेखील यावर कमेंट केल्या आहेत. अभिनेत्री भाग्यश्रीने रितेश-जिनीलियाच्या व्हिडीओवर कमेंट करीत, "तुम्ही दोघे खूप क्यूट आहात", असे म्हटले आहे. अभिनेत्रीने त्यांचे कौतुक केले आहे. तर सुयश टिळकने हसण्याच्या इमोजी शेअर केल्या आहेत. याबरोबरच, प्रसिद्ध युट्यूबर अर्थव सुदामेनेदेखील हसण्याच्या इमोजी शेअर केले आहेत.दरम्यान, आता रितेश देशमुख व जिनिलिया कोणत्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. अभिनेता रितेश देशमुखव जिनिलीया देशमुख हे महाराष्ट्राचे लाडके दादा वहिनी आहेत. चाहते त्यांना दादा वहिनी असे म्हणताना दिसतात. या सेलेब्रिटी जोडप्याचा चाहतावर्ग मोठा आहे. चित्रपटांबरोबरच त्यांच्या सोशल मीडियावरील व्हिडीओंना प्रेक्षकांचे प्रेम मिळताना दिसते.



**बलाढ्य संघाचा पराभव**

## नामिबियाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला

# वर्ल्ड क्रिकेटमध्ये मोठा अपसेट!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**टी-२० क्रिकेट इतिहासात मोठा अपसेट पाहायला मिळत आहे. नामिबिया आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये पहिलाच टी-२० सामना खेळवला गेला आणि या सामन्यात नामिबियाने बलाढ्य दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा दारूण पराभव केला आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ पहिल्यांदाच कोणत्याही असोसिएट संघाविरूद्ध पराभूत झाला आहे. नामिबियाचा संघ हा पूर्ण वेळ क्रिकेट खेळणाऱ्या राष्ट्रांचाही भाग नाही आहे. दक्षिण आफ्रिकेला एकमेव टी-२० सामन्यात पराभूत केल्यानंतर स्टेडियममधील चाहत्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता.**

## विजयानंतर चाहत्यांनी काय केलं?



दक्षिण आफ्रिकेसाठी नामिबियाविरूद्धचा पहिला टी-२० संघ एक काळा दिवस म्हणून कायमच लक्षात राहिल. दक्षिण आफ्रिकेच्या संघाला नामिबियाविरूद्ध एकमेव टी-२० सामन्यात ४ विकेट्सने पराभव पत्करावा लागला आहे.दक्षिण आफ्रिकेने या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी गमावून १३४ धावा केल्या, त्यानंतर नामिबिया संघाने २० षटकांत ६ गडी गमावून अखेरच्या चेंडूवर विजय मिळवला. नामिबियासाठी हा ऐतिहासिक विजय आहे, कारण संघ घरच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय सामना खेळण्यासाठी पहिल्यांदाच मैदानावर उतरला होता. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा असोसिएट देशाविरुद्धचा हा पहिलाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यातील पराभव आहे.तर नामिबियाने चौथ्यांदा पूर्ण सदस्य असलेल्या संघाला पराभूत केलं आहे, यापूर्वी त्यांनी आयर्लंड, झिम्बाब्वे आणि श्रीलंकेला पराभवाचं पाणी पाजलं होतं. नामिबियाने आपल्या घरच्या मैदानावर टी-२० विश्वचषक उपविजेत्या संघावर विजय मिळवलेला पाहता सर्वांनीच उभं राहून टाळ्या वाजवत एकच जल्लोष केला. चाहते स्टेडियममध्ये नाचताना दिसले, ज्याचे फोटो सध्या व्हायरल होत आहेत.नामिबियाच्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या ४ विकेट्सने विजयात यष्टीरक्षक-फलंदाज झेन ग्रीनने महत्त्वाची भूमिका बजावली, २३ चेंडूत नाबाद ३० धावा करत अखेर संघाला विजय मिळवून दिला. याशिवाय कर्णधार जेरार्ड इरास्मसने २१ चेंडूत २१ धावांची खेळीही केली.लहान डे प्रिटोरियसने २२ तर रूबिन हेरमान याने २३ धावांची खेळी केली, तर जे स्मिथने सर्वाधिक ३१ धावांची खेळी केली. याशिवाय आफ्रिकेचे इतर सर्व फलंदाज नामिबियाच्या गोलंदाजीसमोर फेल ठरले. नामिबियाच्या गोलंदाजांची कामगिरी सर्वोत्तम होती, ज्यामध्ये त्यांनी दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना फार वेळ मैदानावर टिकण्याची कोणतीही संधी दिली नाही. ट्रम्पेलमनने तीन, मॅक्स हींगोने दोन आणि कर्णधार जेरार्ड, स्मिथ आणि बेन शिकोंगोने प्रत्येकी एक विकेट घेतली.आयसीसी टी-२० क्रमवारीत १६ व्या क्रमांकावर असलेल्या नामिबियाच्या संघासाठी हा एक मोठा विजय आहे. याचबरोबर आगामी टी-२० विश्वचषक २०२६ साठी नामिबियाच्या संघ पात्र ठरला आहे. त्यामुळे या कामगिरीनंतर मनोबल उंचावलेला संघ अजून कोणता अपसेट घडवणार यावर सर्वांच्या नजरा असतील.दक्षिण आफ्रिकेसाठी नामिबियाविरूद्धचा पहिला टी-२० संघ एक काळा दिवस म्हणून कायमच लक्षात राहिल.

## नामिबियाने रचला इतिहास

नामिबियाने आपल्या घरच्या मैदानावर टी-२० विश्वचषक उपविजेत्या संघावर विजय मिळवलेला पाहता सर्वांनीच उभं राहून टाळ्या वाजवत एकच जल्लोष केला. नामिबियाच्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या ४ विकेट्सने विजयात यष्टीरक्षक-फलंदाज झेन ग्रीनने महत्त्वाची भूमिका बजावली, २३ चेंडूत नाबाद ३० धावा करत अखेर संघाला विजय मिळवून दिला.

दक्षिण आफ्रिकेच्या संघाला नामिबियाविरूद्ध एकमेव टी-२० सामन्यात ४ विकेट्सने पराभव पत्करावा लागला आहे.दक्षिण आफ्रिकेने या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी गमावून १३४ धावा केल्या, त्यानंतर नामिबिया संघाने २० षटकांत ६ गडी गमावून अखेरच्या चेंडूवर विजय मिळवला. नामिबियासाठी हा ऐतिहासिक विजय आहे, कारण संघ घरच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय सामना खेळण्यासाठी पहिल्यांदाच मैदानावर उतरला होता. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा असोसिएट देशाविरुद्धचा हा पहिलाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यातील पराभव आहे.तर नामिबियाने चौथ्यांदा पूर्ण सदस्य असलेल्या संघाला पराभूत केलं आहे.

# यशस्वी जैस्वालने घडवला इतिहास

## जैस्वालनेइंडिजविरुद्ध कसोटीत 175 धावांची उत्कृष्ट खेळी केली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**यशस्वी जैस्वालने वेस्ट इंडिजविरूद्ध दिल्ली कसोटीत १७५ धावांची विक्रमी खेळी केली. यशस्वी जैस्वालने कसोटी क्रिकेटच्या १४८ वर्षांच्या इतिहासात डॉन ब्रॅडमननंतर ऐतिहासिक कामगिरी करून मोठ्या वर्ल्ड रेकॉर्डची आपल्या नावे नोंद केली आहे. यशस्वी जैस्वालच्या खेळीसह भारताचा कर्णधार शुबमन गिलने १२९ धावांची शानदार खेळी केली आणि संघाला मोठी धावसंख्या करण्यात मदत केली.**




पहिल्या कसोटीत चांगली सुरुवात मिळूनही मोठी खेळी करण्यात अपयशी ठरल्यानंतर, या सामन्यात जैस्वालने उणीव भरून काढली. शुबमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर भारतीय संघाने ५ बाद ५१८ धावा करत डाव घोषित केला. भारताच्या टॉप-५ फलंदाजांनी उत्कृष्ट फलंदाजी करत संघाला मोठी धावसंख्या उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.यशस्वीने पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत १७३ धावांची खेळी केली होती. मात्र दुसऱ्या दिवसाच्या सुरूवातीलाच विचित्र पद्धतीने धावबाद झाल्याने त्याचं द्विशतक हुकलं. मात्र तरीही त्याने अनेक विक्रम आपल्या नावे केले. ही जैस्वालच्या कसोटी कारकिर्दीतील सातवी शतकी खेळी ठरली आणि त्यापैकी पाच खेळी या १५० धावांहून अधिक धावांच्या आहेत. विशेष म्हणजे, त्याच्या पहिल्या चारही शतकांच्या खेळी १५० पेक्षा जास्त धावांच्या होत्या, अशी दुर्मिळ कामगिरी करणारा तो ग्रॅमी स्मिथनंतरचा फक्त दुसरा खेळाडू ठरला आहे.२३ वर्षे किंवा त्याहून कमी वयात १५० पेक्षा जास्त धावांच्या पाच खेळी करणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे.

## सचिन तेंडुलकरला टाकलं मागे

खरं तर, या वयात त्याच्यापेक्षा जास्त अशा खेळी फक्त डॉन ब्रॅडमन यांच्या नावावर आहेत. तब्बल ९३ वर्षांपूर्वी, १९३२ मध्ये, आपल्या कसोटी पदार्पणानंतर त्यांनी ८ खेळी केल्या ज्या १५० अधिक धावांच्या आहेत.यशस्वी जैस्वाल हा कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील वयाच्या २३ व्या वर्षी १५०+ धावांच्या पाच खेळी करणारा पहिला सलामीवीर ठरला आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार।
। दि. 12 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


PASSPORT TO THE FUTURE
ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
8698360005 | 9637339988
www.rklgis.org rklgis RKLGalaxyInternationalSchool
RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

## भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवडचा उपक्रम

# पूरग्रस्तांची दिवाळी होणार गोड!

### "एक हात मदतीचा!" : सोलापूर पुरग्रस्तांच्या भावना; आपत्तीच्या काळात मानवतेचा दीप प्रज्वलित करणारा उपक्रम!



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**
**अतिवृष्टी व महापुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात मदतीचा हात पुढे करत भारतीय जनता पार्टीच्या युवा मोर्चा पिंपरी-चिंचवडच्यावतीने "एक हात मदतीचा" या उपक्रमाअंतर्गत मदतकार्य सुरू करण्यात आले आहे.**

या उपक्रमाचे प्रेरणास्थान आमदार महेश लांडगे असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही सामाजिक जबाबदारी पार पाडली जात आहे. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी धान्य, अन्नधान्य, कपडे, औषधे आणि जीवनावश्यक वस्तू घेऊन मदतीचा ट्रक शुक्रवारी दि. 10 ऑक्टोबर रोजी मोशी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र येथून रवाना करण्यात आला.

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यामध्ये खडकी ग्रामपंचायत आहे. या ठिकाणी मदतकार्य करण्यात आले. गावचे सरपंच उमाकांत बरडे, उपसरपंच अशोक देशमुख यांचे मदत वितरण करण्यासाठी सहकार्य झाले. या गावामध्ये एकूण 510 मदत किटचे वितरण केले आहे. यावेळी गावातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहून सामाजिक कार्यात सहभाग घेतला. एक हात मदतीचा या उपक्रमाविषयी गावकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, समाजातील प्रत्येक घटकाने अशा संकटाच्या काळात एकत्र येणे हीच खरी सेवा असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. पूरग्रस्तांना दिलासा देणारा आणि युवकांना समाजकार्याची जाणीव करून देणारा "एक हात मदतीचा" उपक्रम भविष्यातील सामाजिक कार्यासाठी एक प्रेरणास्त्रोत ठरणार आहे.

> "समाजावर ओढवलेल्या संकटाच्या काळात मदतीचा हात पुढे करणं हीच खरी देशसेवा आहे. आपल्या लहानशा प्रयत्नामुळे जर कोणाच्या चेहऱ्यावर हास्य फुलणार असेल, तर त्याहून मोठं समाधान काही नाही. भारतीय जनता पार्टी आणि आमदार महेश लांडगे यांच्या प्रेरणेनुसार हा उपक्रम हाती घेतला आहे."
> **-दिनेश लालचंद यादव,**
> **शहराध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा, पिंपरी-चिंचवड.**

## आमदार लांडगे यांचे शिलेदार मदतीसह करमाळ्याच्या गावांमध्ये दाखल

# पूरग्रस्त बाळेवाडी, भालेवाडी आणि पोटेगाव ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर हसू फुलले!

### शिवराज लांडगे यांच्या पुढाकारातून जीवनावश्यक मदतीचे वाटप

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठवाड्याच्या सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या आपल्या शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांचे खंदे शिलेदार मंडल अध्यक्ष शिवराज लांडगे तालुक्याच्या तीन गावांमध्ये मदतीसह दाखल झाले. जीवनावश्यक वस्तूंसह दिवाळीसाठी लागणाऱ्या गोष्टींचे वाटप शिवराज लांडगे यांच्या उपस्थितीत करण्यात आले यावेळी ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हसू फुलले.**



मराठवाड्याच्या विविध भागात पावसाने निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीने ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतातील उभे पिके वाहून गेली, घरात पाणी शिरले आणि अनेक कुटुंबं उघड्यावर आली आहेत. दिवाळी जवळ येत असताना परिस्थिती अधिकच विदारक झाली होती. या पार्श्वभूमीवर, आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भोसरी परिसरातील भारतीय जनता पक्षाच्या शिलेदारांनी मदतीचा ओघ सुरू करत पूरग्रस्त गावांमध्ये मदतीसह हजेरी लावली. अन्नधान्य, उबदार कपडे, फराळाचे साहित्य, मेणबत्त्या, सुकामेवा अशा आवश्यक वस्तू घेऊन शिलेदार गावोगावी पोहोचले. शिवराज लांडगे एक ट्रक भरून साहित्य घेऊन बाळेवाडी भालेवाडी आणि पोटेगाव मध्ये शनिवारी हजर झाले. त्यांनी आणलेली मदत गावकऱ्यांनी अश्रूंच्या भरल्या डोळ्यांनी ही स्वीकारली. मदतीचा हा ओघ, समर्पण, शेतकऱ्यांप्रती असलेली सामाजिक बांधिलकी पाहून गावकरी अक्षरशः भारावले. यावेळी शिवराज लांडगे यांनी केवळ वस्तूंचे वाटपच केले नाही, तर ग्रामस्थांना धीर देत, संकटातून सावरण्यासाठी पाठबळही दिले.

"ही केवळ मदत नाही, तर बळीराजाप्रती असलेली आपली सर्वांची जबाबदारी आहे. सप्टेंबर महिन्यात तुफान पाऊस बरसला. मराठवाड्यासह सोलापूर, करमाळा भागामध्ये मोठे नुकसान झाले. आपल्या सर्वांचा पोशिंदा आपला शेतकरी बांधव या नुकसानीची झळ सोसत आहे. शेती खरवडून निघाली आहे. दारात बांधलेले गोधन या पावसाने हिरावून घेतले. अशावेळी या सर्वांच्या मदतीला धावून जाणे हे कर्तव्य समजून आम्ही आज या गावांमध्ये आलो. आणि आपल्या बांधवांना सावरण्याचा प्रयत्न केला आहे.

**-शिवराज लांडगे,**
**मंडल अध्यक्ष, इंद्रायणीनगर- भोसरी, भारतीय जनता पक्ष**

दरम्यान यावेळी बाळेवाडी गावचे सरपंच नितीन हनुमंत लोंढे, उपसरपंच पानाचांद नलवडे , ग्रामपंचायत अधिकारी दत्तात्रय निकम उपस्थित होते. भालेवाडी गावचे सरपंच गणेश सरडे , उपसरपंच पप्पू सरडे ,ग्रामसेवक काळे भाऊसाहेब तसेच पोटेगावचे सरपंच आशा अजिनाथ भागडे, उपसरपंच वैशाली हराळ, ग्राम विकास अधिकारी सुशेन ननवरे यावेळी उपस्थित होते.

---

## चिखलीत खड्डेमय रस्ते दुरुस्तीसाठी आंदोलन

### यश साने यांचे अनोखे आंदोलन; "पिंपरी ग्रामपंचायत नाही' म्हणत अधिकाऱ्यांना दाखविला आरसा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अंगणवाडी रोड व चिंचेचा मळा ते वाघू साने चौक हा चिखली परिसरातील प्रमुख मार्ग पूर्णपणे भरला असून, नागरिक, विद्यार्थी व वाहनचालक यांचा जीव रोज धोक्यात आला आहे. पावसाळा संपूनही रस्त्याचे डांबरीकरण न झाल्याने अखेर येथील नागरिकांनी अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. तसेच दिवाळीपूर्वी रस्ता नाही झाला तर जनआंदोलन करण्याचा इशारा यश साने यांनी दिला.**



चिखली परिसरातील अंगणवाडी रोड व चिंचेचा मळा ते वाघू साने चौक हा मार्ग गेल्या अनेक महिन्यांपासून खड्ड्यांनी भरून गेला असून, नागरिक, विद्यार्थी आणि वाहनचालक यांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाळा संपूनही रस्त्याचे डांबरीकरण न झाल्याने संतप्त नागरिकांनी अखेर अनोख्या पद्धतीने आंदोलन छेडले. या आंदोलनाचे नेतृत्व सामाजिक कार्यकर्ते यश साने यांनी केले. रस्त्यांची दुरवस्था आणि प्रशासनाचे निष्क्रिय धोरण याविरोधात नागरिकांनी आरशासमोर उभे राहत, "पालिका आहे, ग्रामपंचायत नाही!" असा संदेश देत अधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली. आंदोलकांनी रस्त्यावरील खड्ड्यांचे छायाचित्रे मोठ्या बॅनरवर छापून ती अंगावर अडकवली. "खड्डे की रस्ते?" असा सवाल करत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. यश साने म्हणाले, "चिखली परिसर हा पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत असूनही येथील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळत नाहीत. वारंवार तक्रारी करूनही पालिका प्रशासनाने डांबरीकरणाचा विषय थंड बस्त्यात ठेवला आहे.

दिवाळीपूर्वी रस्ता दुरुस्त न झाल्यास आम्ही मोठे जनआंदोलन उभारू." यानंतर आंदोलकांनी महापालिकेच्या 'फ' क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांना निवेदन सादर केले. पाटील यांनी नागरिकांच्या मागण्यांकडे लक्ष देण्याचे आश्वासन दिले असून, संबंधित विभागाशी समन्वय साधून लवकरात लवकर उपाययोजना केली जाईल, असे सांगितले.

या आंदोलनात रुपेश मोरे, विनायक बनसोडे, रुषी साने, रोशन पाणमंद, मोहन डोळ, बाळासाहेब मोरे, रमेश सांगडे, गणेश शिंदे, अशोक पवार, गणेश अवचिते, कुणाल मराठे, आकाश जाधव, प्रशांत कदम, सागर केळसकर, अभिजित साने, गणेश मोरे, दीपक साने आणि नीलेश साने आदी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.ॅनागरिकांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर वेळेत काम सुरू झाले नाही तर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केले जाईल. चिखली परिसरातील हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, आता लोकांच्या संयमाचा बांध तुटण्याच्या मार्गावर आहे. या आंदोलनामुळे पुन्हा एकदा प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

## शिक्षण क्षेत्रातील दीर्घकाळ निस्वार्थी सेवा

# संत साई हायस्कूलचे संस्थापक शिवलिंग ढवळेश्वर यांना “पुणे जिल्हा शिक्षा पुरस्कार”!

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या योगदानाची दखल

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज




**भोसरी येथील संत साई हायस्कूलचे संस्थापक व मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर यांना शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल “पुणे जिल्हा शिक्षा पुरस्कार २०२५” हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

विद्याभारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान, पुणे यांच्या वतीने “पुणे जिल्हा शिक्षा पुरस्कार २०२५” चे वितरण मोठ्या उत्साहात पार पडले.

मुख्याध्यापक ढवळेश्वर यांनी 1990 च्या दशकात भोसरी सारख्या भागात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी दीर्घकाळ निस्वार्थी सेवा दिली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी घेतलेले विविध उपक्रम, शैक्षणिक नवकल्पना आणि नैतिक मूल्यांची रुजवणूक यामुळे संस्थेचा दर्जा आज विशेष उंचावला आहे.

शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाची दखल म्हणून त्यांना हा गौरव प्राप्त झाला. पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, मानपत्र व सन्मानचिन्ह असे होते.

या कार्यक्रमाला शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्याभारतीच्या संस्थेच्या वतीने पुरस्काराचे महत्त्व अधोरेखित करत ढवळेश्वर यांचे विशेष अभिनंदन केले. ढवळेश्वर सरांनी पुरस्कार स्विकारताना नम्रतेने आपल्या यशाचे श्रेय आपल्या सहकारी शिक्षकवर्ग, विद्यार्थ्यांचे पालक व शाळेच्या सर्व सहकाऱ्यांना दिले. त्यांनी आपल्या भाषणात शिक्षण हा समाज परिवर्तनाचा मजबूत आधार आहे, असे स्पष्ट करत नव्या पिढीला मूल्याधिष्ठित शिक्षण देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. उपस्थित सर्वांनी ढवळेश्वर सरांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

---

## पूरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा

### अशोकतात्या पठारे सोशल फाउंडेशनतर्फे 300 मदत किटचे वाटप

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज




**जीवनावश्यक साहित्य, अन्नधान्य व वैद्यकीय किटसह मदतीचा हात; पूरग्रस्तांसाठी सामाजिक बांधिलकीची प्रेरणादायी मोहिम\पिंपरी-चिंचवड: आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अशोकतात्या पठारे सोशल फाउंडेशनच्या पुढाकाराने पूरग्रस्त नागरिकांसाठी 300 मदत किट तयार करण्यात आले आहेत.**

ही किट लवकरच पूरपरिस्थितीत अडकलेल्या भागात पाठविण्यात येणार असून, संकटग्रस्त नागरिकांना तातडीची मदत मिळवून देणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

या मदत किटमध्ये अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू, स्वच्छतेसाठी लागणारे साहित्य तसेच प्राथमिक वैद्यकीय सामग्री यांचा समावेश करण्यात आला आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे उध्वस्त झालेल्या कुटुंबांना दिलासा देण्यासाठी हा एक माणुसकीचा हात पुढे करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना युवा नेतृत्व अशोक लक्ष्मण पठारे म्हणाले, “संकटाच्या काळात एकमेकांना मदतीचा हात देणं ही आपल्या संस्कृतीची ओळख आहे.

पुरामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. आम्ही फक्त एक छोटीशी मदत करण्याचा प्रयत्न केला आहे.” पूरग्रस्त भागांमध्ये प्रत्यक्ष मदत पोहोचवण्यासाठी स्वयंसेवकांची टीमही सज्ज असून, मदतीचा प्रत्येक किट योग्य त्या गरजूंना पोहोचवला जाणार आहे. अशा उपक्रमांमुळे सामाजिक एकोपा अधिक मजबूत होतो, अशी भावना स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046